॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२८ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या एल.एल.बी. (तृतीय वर्ष) अभ्यासक्रमातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांमधून (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व विमुक्त जाती / भटक्या जमाती) प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास ॲड वसंतराव धनाजी बिऱ्हाडे सुवर्णपदक देण्यात येणार आहे.

त्याकरीता देणगीचा धनादेश विद्यापीठास देण्यात आला. यावेळी कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील, प्रभारी अधिष्ठाता प्रा. एस.टी. भुकन, प्रभारी अधिष्ठाता प्राचार्य प्रा. एस.एस. राजपूत, संजय भैसे, श्रीमती छाया वसंतराव बिऱ्हाडे व श्रीमती विजयाबाई वसंतराव बिऱ्हाडे हे उपस्थित होते. श्रीमती बिऱ्हाडे यांनी विद्यापीठास देणगी रक्कम देवून एल.एल.बी. (तृतीय वर्ष) अभ्यासक्रमातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांमधून (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व विमुक्त जाती / भटक्या जमाती) प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास ॲड वसंतराव धनाजी बिऱ्हाडे सुवर्णपदक देणेकरीता सुरु करणेबाबत विनंती केली होती. त्याअनुषंगाने यावर्षापासून हे सुवर्णपदक देण्यात येणार आहे.

..............................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: २८ मे, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता